MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

## बीड शिवसेना(शिंदे गट) जिल्हाप्रमुख अनिल जगताप अस्वस्थ



**मुंबईतील रूग्णालयात उपचार; प्रकृती ठिक**

प्रतिनिधी । बीड


शिवसेना शिंदे गटाकडून बीड विधानसभेसाठी इच्छुक असलेले जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांना सोमवारी अस्वस्थ वाटू लागले. त्यामुळे त्यांना तातडीने मुंबईच्या बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती सध्या ठिक असल्याची माहिती दुसरे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सोशल मीडियावरून दिली आहे.


बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -३१ | शुक्रवार दि.१८ ऑक्टोबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -31 | FRIDAY DT.18 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# मोहन जगताप बाबरी मुंडे मध्ये सरळ लढत!

- मोहन दादांना निवडून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध गेल्या पंचवार्षिक ला केलेली चूक आम्ही यावेळी दुरुस्त करू माजलगाव मतदार संघातील जनतेमध्ये चर्चेला उदान!
- मोहन दादा जगताप हे नाव माजलगाव मतदार संघातील जनतेला मराठा नव्हे तर अठरापगड जाती लोकांना पसंतीचे वाटुलागली










- **मोहन जगताप बाबरी मुंडेंची माजलगाव मतदार संघात दमदार एंन्ट्री**
  **ओबीसी मराठा मध्ये जर टक्कर झाली तर बाबरी मुंडे मोहन जगताप मध्ये होणार सरळ लढत.**
  **प्रकाश सोळंके यांनी आपणच लढावं म्हणून कार्यकर्त्यांच्या कानात सांगितल्यामुळे जयसिंह सोळंके यांची उमेदवारी धोक्यात?**
- **पक्षाने उमेदवारी दिली नाही तरी बाबरी मुंडे लढणारच!**
- **बाबरी मुंडे यांनी दिलेली निवडणुकीचे संकेत हे अनेकांचे धाबे दणाणले!**
- **बाबरी मुंडे यांचे संपर्क कार्यालय माजलगाव मध्ये झाल्यामुळे अनेकांच्या भवया उंचावल्या!**
  **भाजपने बाबरी मुंडे यांना उमेदवारी नाही दिली तरी अपक्ष लढण्याची बाबरी मुंडे यांची तयारी!**
- **बाबरी मुंडेंनी माजलगाव मतदार संपर्क कार्यालय केल्यामुळे प्रकाश सोळंके जयसिंह सोळंके चे धाबे दणाणले!**

माजलगाव /प्रतिनिधी

महाराष्ट्राचा राजकारण तापल्यानंतर शरद पवारांची राष्ट्रवादी फुटली आणि ती स्वत: त्यांचे पुतणे अजित पवार यांनी फोडल्यानंतर बीड जिल्ह्यातील आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आमदार बाळासाहेब आजबे व माजलगाव मतदार संघातील माजी मंत्री तथा विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादी मध्ये जाण्याचा निर्णय घेतला त्यानंतर परळीचे आमदार व विद्यमान पालकमंत्री धनंजय मुंडे हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री झाले तर गेवराई मतदार संघातून माजी आमदार अमरसिंह पंडित यांचा मोठा गट अजित पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये डेरे दाखल झाला परंतु आता तिकिटासाठी रस्सीखेच सुरू असतानाच माजलगाव मतदार संघामध्ये जर मराठा ओबीसी वादामध्ये जर लढत झाली तर ती सरळ बाबरी मुंडे व मोहन दादा जगताप यांच्यामध्ये होण्याची दाट शक्यता आहे कारण मोहन जगताप व बाबरी मुंडे हे सर्वसामान्यांच्या सुखदु:खामध्ये धावून जाणारे नेतेमंडळी आहेत यांच्या कार्यकाळामध्ये अनेकांना मदती झालेल्या आहेत

अनेकांच्या सुखदु:खामध्ये हे स्वत: हजर राहत त्या ठिकाणी अडचणी मध्ये आलेल्या लोकांच्या पाठीशी उभा राहून आपला जनसंपर्क व माणुसकीचे दर्शन दिलेले आहे यामध्ये बाबरी मुंडे हे तरुणांचे नेतृत्व करतात तर ज्येष्ठांच्या नेतृत्वामध्ये मोहन जगताप हे आहेत मोहन जगताप यांच्याकडे साखर कारखाना असल्यामुळे त्या ठिकाणी माजलगाव मतदार संघामध्ये छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून अनेक शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी मोहन जगताप हे कटिबद्ध असतात तर वडवणी माजलगाव मतदार संघामध्ये युवकांचे नेते सोबत घेत बाबरी मुंडे यांनी आता या ठिकाणी माजलगावलाच संपर्क कार्यालय टाकल्यामुळे रमेश आडसकर ही आता आमदारकीच्या रेस मधून बाहेर पडलेले आहेत तर राष्ट्रवादीचे शरद पवार गटाचे नेते अशोक आबा डक हे सुद्धा आमदारकीच्या रेस मधून बाहेर पडलेले आहेत कारण या ठिकाणी आता माजलगाव मतदार संघातील जनता ही बाबरी मुंडे व मोहन जगताप यांना पसंती देत आहे आणि मराठा ओबीसी वादामध्ये बाबरी मुंडे मोहन जगताप यांचे आता नेमके कोण विजय होणार याचा विचार व चर्चा सध्या लोकांमध्ये होत आहे बाबरी मुंडे व मोहन जगताप ही अठरापगड जातील सोबत घेऊन चालणारे दोन्ही नेते आहेत तर या ठिकाणी माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील यांनी सांगितले आहे की मी कुणाचीही शिफारस केली नाही मीच शरद पवार च्या राष्ट्रवादीचा उमेदवार असेल तर त्यामुळे रमेश आडसकर हे माजलगाव मतदार संघाच्या चर्चेतून बाहेर पडल्याची चर्चा आता माजलगाव मतदारसंघात ऐकायला मिळत आहे





## प्रकाश सोळंके जयसिंह सोळुंखे यांना माजलगाव मतदार संघातील निवडणूक जडच!

प्रकाश सोळंके जयसिंह सोळंके आमदारकीच्या रेसमध्ये ३०७ च्या गुन्ह्यांमुळे मोठ्या प्रमाणात नाराजीचा सूर निघत आहे प्रकाश सोळंके यांच्यामुळे मराठा आंदोलनाकाच्या जाळपोळीमध्ये अनेक गुन्हे दाखल झाले होते त्यामध्ये अनेक निष्पाप तरुणांना अठरापगड जातीची लोकांना त्रास झाला होता मातंग समाज मुस्लिम समाज मराठा व दलित समाजातील कार्यकर्त्यांवर मराठा आंदोलकाचे खोटे गुन्हे राजकीय देशातून प्रकाश सोळंके यांनी दाखल करायला लावले होते त्यामुळे प्रकाश सोळंके विषय माजलगाव मतदार संघामध्ये एक मोठ्या प्रमाणावर रोष व्यक्त होत असताना येणारी २०२४ ची निवडणुकीमध्ये चुलत्या पुतण्या पैकी जो उमेदवार असेल त्याला ही निवडणूक खूप जड जाईल हे चित्र स्पष्ट दिसून येत आहे

माजलगाव मतदार संघामध्ये मराठा ओबीसी संघर्ष मोठ्या प्रमाणात आहे या मतदारसंघाचा आमदार हा आता मराठा ओबीसी दोन्हीपैकी एक होणार आहे हे मात्र निश्चित आहे परंतु माजलगाव मतदार संघात दलित मुस्लिम समाजातील मताला मोठे महत्व मिळणार आहे त्यामुळे मोहन जगताप आणि बाबरी मुंडे या दोघांकडेही दलित मुस्लिम मतांचे सर्वसामान्य लोक व नेतेमंडळी आहेत त्यामुळे नेमकं दलित मुस्लिमांची मतं कोणाला मिळतात याकडे माजलगाव मतदार संघातील जनतेचे लक्ष लागले आहे.

- **मोहन दादा जगताप यांना छत्रपती साखर कारखाना व प्रत्येकाच्या सुखदु:खामध्ये जाऊन वेळ देणे हे लोकांना वाटतं की मोहनदादा**
- **आमदार झाले तर अजूनही आपली चांगलं होईल माजलगाव मतदार संघामध्ये विकास होईल**
- **माजलगाव ची उमेदवारी तुतारीने मोहन जगताप यांना दिली तर भारीच**

# गेवराई विधानसभा निवडणुकीसाठी डॉ. एस.एस. पटेल इच्छुक!

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील मातोरी येथील मूळ रहिवासी आणि सध्या छत्रपती संभाजीनगर येथे वास्तव्यास असलेले उच्चशिक्षित समाजसेवक डॉ . एस. पटेल हे आगामी विधानसभा निवडणूक गेवराई विधानसभा मतदारसंघातून लढविण्यासाठी उत्सुक असून त्यांनी मतदारांच्या गाठीभेटीना सुरुवात केली आहे .डॉ . शेख शब्बीर महबूब उर्फ डॉ . एस. एस . पटेल या नावाने ते गेवराई तालुक्यात व शिरूर तालुक्यात सर्वांना परिचित आहेत .डॉ . पटेल यांचा प्रवास मातोरीचे सरपंच ते राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे अल्पसंख्यांक विभागाचे राज्याचे उपाध्यक्ष असा झालेला आहे . हल्ली छत्रपती संभाजीनगर येथे ते राहत असून गेवराई विधानसभा मतदारसंघात त्यांचे लक्ष आहे . गेवराई तालुक्यातील पूर्वीच्या मातोरी या गावचे ते काही वर्ष सरपंच होते . १९८६ ते २००३ या कालावधीत त्यांनी गेवराईत फिजिशियन डॉक्टर म्हणून उत्तमरित्या जनसेवा केली आहे . त्यानंतर राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टीचे १९९६ ते १९९९ या कालावधीमध्ये ते तालुकाध्यक्ष होते . त्यानंतर १९९९ ते २००४ या कालावधीमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले आहे . २००४ ते २००९ या कालावधीत त्यांनी भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष म्हणून कार्य केले आहे . २००६ ते २०११ या कालावधीत ते जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक होते . २०२२ पासून डॉक्टर पटेल हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या अल्पसंख्यांक विभागाचे राज्याचे उपाध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी पक्ष फुटीपर्यंत होते . येथील सुप्रसिद्ध अष्टविनायक ज्ञानदीप कला व क्रीडा मंडळाचे ते पदाधिकारी होते . गेवराई तालुक्यात अमर एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी या संस्थेच्या माध्यमातून डॉ . पटेल यांनी अनेक ठिकाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये सुरू केले आहेत . अमर एज्युकेशन अँड हेल्थ वेल्फेअर संस्थेचे ते विद्यमान सचिव आहेत . गेवराई शहर व परिसरात त्यांचा दांडगा संपर्क आहे . गेवराई विधानसभा मतदारसंघात अनेक मातब्बर व नवोदित कार्यकर्ते वेगवेगळ्या पार्टीकडून इच्छुक असतानाच डॉ . पटेल यांनीही विधानसभा निवडणूक लढवण्याच्या चक्रव्यूहामध्ये उडी घेतली आहे . त्यांचा शांत स्वभाव व काम करण्याचा उत्साह यामुळे ते मतदारसंघांमध्ये प्रसिद्ध आहेत . तालुक्यातील जनतेच्या सुखदुःखात, विवाह प्रसंगात ते आवर्जून भेटी देत असतात. माजी विधान



परिषद सदस्य तथा वक्फ बोर्डाचे माजी अध्यक्ष एम . एम . शेख यांचे ते छोटे बंधू आहेत . डॉ . पटेल यांना राजकारणाची तरुणपणापासून आवड असून त्यांची समाजसेवा अविरत चालू असते . एकीकडे महाविकास आघाडी तर दुसरीकडे महायुतीचे शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी अशा पार्टीचे इच्छुक धावपळ करताना दिसत असून यात डॉ . एस . एस . यांच्या नावाची भर पडली आहे . डॉ . पटेल हे माजी राज्यमंत्री गेवराई तालुक्याचे शिल्पकार शिवाजीराव पंडित दादा व अमरसिंह पंडित यांचेही कार्यकर्ते आहेत . मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे ते बालमित्र असून आगामी निवडणुकीत डॉक्टर पटेल एम .आय . एम पार्टी अथवा जरांगे यांच्या आशीर्वादावर गेवराई विधानसभा मतदारसंघात आपले नशीब आजमावतील अशी शक्यता आहे . कारण महाविकास आघाडीच्या वतीने माजी राज्यमंत्री बदामराव पंडित व भाजपापासून दूर झालेले विद्यमान आमदार ड . लक्ष्मण पवार यांच्यानंतर महायुतीचे उमेदवार म्हणून विजयसिंह शिवाजीराव पंडित हे सर्वात पुढे आहेत त्यामुळे डॉक्टर पटेल हे पंडितांना सोडून कोणता सवतासुभा निर्माण करीत आहेत हे मात्र समजले नाही . मात्र जरांगेंच्या आशीर्वादावर गेवराई विधानसभा मतदारसंघात ते निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असल्याचे जाणवले . गेल्या २०१९ च्या विधान सभा निवडणुकीत ही त्यांनी आपली उमेदवारी दाखल केली होती मात्र माजी आ. अमरसिंह पंडित यांचे बंधू विजयसिंह पंडित यांच्या उमेदवारीमुळे त्यांनी माघार घेतली होती . ते कोणत्या पक्षाकडून अथवा अपक्ष म्हणून निवडणूक लढवतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .



## स्व. नाना पालकर हे राष्ट्रासाठी जीवन समर्पित करणारे व्यक्तिमत्व : मुंदडा

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

स्व. नाना पालकर यांनी आयुष्यभर मनुष्य निर्मितीचे सर्वांत मोठे विधायक कार्य केले. आरोग्यसेवेच्या माध्यमातून स्वतः अनंत खसता खात व स्वतःतील मी पण विसरत त्यांनी गरजवंत व गरीब रूग्णांना मदतीचा हात दिला. गरजवंत व गरीबांच्या आनंदासाठी ते आयुष्यभर झिजले, असे राष्ट्रासाठी जीवन समर्पित करणारे व्यक्तिमत्व म्हणजे स्व. नाना पालकर होय असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा यांनी केले. ते खोलेश्वर महाविद्यालयात आयोजित स्व. नाना पालकर स्मृती आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भा.शि.प्र. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्रजी आलूरकर हे उपस्थित होते. तर उद्घाटन सोहळ्यासाठी व्यासपीठावर केंद्रीय कार्यकारिणी सदस्या वर्षाताई मुंडे, विष्णुपंत कुलकर्णी, स्थानिक व्यवस्था मंडळाचे कार्यवाह किरण कोदरकर,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, परीक्षक डॉ. सुनील राऊत, मुख्याध्यापिका स्वरूपाताई कुलकर्णी तसेच बळीराम पुरी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. बुधवार, दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ रोजी खोलेश्वर महाविद्यालयात स्व. नाना पालकर स्मृती आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. हे या स्पर्धेचे ५४ वे वर्ष आहे. प्रारंभी सर्व मान्यवरांनी स्व. नाना पालकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व देवी सरस्वतीच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्ज्वलन केले. याप्रसंगी कु. नंदिनी कुलकर्णी हिने इशस्तवन सादर केले. पुढे बोलताना नंदकिशोर मुंदडा म्हणाले की, आपण केलेले कार्य हे समाज हिताचे असले पाहिजे. आपल्या कृतीतून समाजातील दुःख, वेदना दूर झाल्या पाहिजेत. असाच समर्पित जीवनाचा समृद्ध वारसा ज्येष्ठ कवी, स्वयंसेवक स्व. नाना पालकर यांनी आपणांस दिलेला आहे. तोच वारसा विद्यार्थ्यांनी अंगिकारून पुढे चालवला पाहिजे असे मत व्यक्त केले. एखादा विषय घेऊन तो अभ्यासून त्यावर बोलणे एक वेळ सोपे आहे. परंतु, अनुभवातून आलेले विचार मांडणे अवघड आहे. परंतु, तेच विचार समाजासमोर प्रभावीपणे मांडता येणे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. स्पर्धेसाठी निवडलेल्या विषयांचेही त्यांनी यावेळी कौतुक केले. खोलेश्वर महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा पाया मजबूत करण्याचे तसेच उत्तम संस्कारीत पिढी घडविण्याचे कार्य सातत्याने करत आले आहे अशा शब्दांत त्यांनी महाविद्यालयाचे ही कौतुक केले.

## माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांच्याशी डी.वाय.एस.पी.विश्वंभर गोल्डे यांचे गैरवर्तन

### बीड चे पोलीस अधीक्षक यांच्याकडे केली या गैरवर्तन प्रकाराची तक्रार




बीड । प्रतिनिधी

उपविभागीय अधिकारी विश्वंभर गोल्डे व त्यांचे कार्यालयातील कर्मचारी यांनी दिनांक १६/१०/२०२४ रोजी विनाकारण त्रास दिला आहे.पोलीस मुख्यालय येथे ११ ते १२ वाजण्याच्या दरम्यान दिनांक ०९/०४/२०२४ माहिती अधिकार अर्जावर काय कारवाई झाली का?विचारणा करिता गेलो होतो.पूर्व वैमन्यस माझ्या बद्दल सदरील कार्यालयाचे कर्मचारी, अधिकारी यांच्यात दिसून आले, या कार्यालयात बॅन करण्याचा प्रकार दिसून आला.उल्लेखित तारखेला जेव्हा माजी सैनिक प्रकाश वाघमारे तेथे पोहोचलो व विचारपूस करू लागलो, चुकीची माहिती देवून पडताळीत करता हे योग्य नाही असे म्हणालो,माहित न होता निर्णय घेता हजर असल्यास सुनावणी पुढे ढकलतो माहिती आपल्या संबंधीत असतानी राज्य आयोगाकडे वर्ग करता हा कर्तव्य कसूर अधिकारांचा गैरवापर आहे. तेथील कर्मचाऱ्यांना म्हणालो त्याच क्षणी या कार्यालयाची माहिला कर्मचारी शिंदे व इतर तीन कर्मचारी उपविभागीय अधिकारांना विचारतो म्हणून उपविभागीय अधिकारी विश्वंबर गोल्डे यांच्या कॅबीन मध्ये गेले व बंद दरवाजात चर्चा करून वाद घालण्याचा प्लॅन केला, वाईट शब्द प्रयोग करा म्हणजे संबंधित व्यक्ती मोठ्याने बोलल्या मुळे त्याच्यावर कलम ३५३ गुन्हा दाखल करू आणि कॅबीन मधून बाहेर आल्यावर तसा प्रकार ही झाला, माझ्याशी हुज्जत घातली, वाद विवाद केला.उपविभागीय अधिकारी यांनी पोलीस गाडी मागवून तेथील कर्मचाऱ्यांना आदेश दिले धक्के मारून याला गाडीत नेवून बसवा पोलीस मुख्यालय गेट पासून शहर पोलीस स्टेशन बीडला घेवून गेले व सकाळी ११ ते रात्री १० वा. पर्यंत बसवून ठेवले. तेथील कर्मचारी ही आरोपी प्रमाणे माझी हजेरी घेत होते. हा विनाकारण त्रास देण्यात आला, असैवंधानिक भाषेचा वापर केला. अपमानीत केले, आपण या विभागाचे प्रमुख असल्याचने यांच्या गैरवर्तनावर कारवाई करण्याचे आपले कर्तव्य आहे, आपणास विनंती उचीत कारवाई करावी,अशी माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी निवेदनाद्वारे

## माझं राजकीय अस्तित्व संपवण्याचा डाव, जनतेचा आशीर्वाद आहे तोवर मी कुणाला घाबरत नाही - धनंजय मुंडे

### पुण्यातील विद्यार्थी संवाद मेळाव्यास तुफान प्रतिसाद कॉलेज जीवन व मैत्रीतील अनेक आठवणीना मुंडेंनी दिला उजाळा

पुणे (प्रतिनिधी)

मी ज्याच्यासोबत आहे त्याच्यासोबत इमानदारी दाखवली म्हणून माझं राजकीय अस्तित्व संपवण्याचा डाव आखला जातं आहे, माझ्या नशिबात संघर्ष पाचवीला पुजला आहे, त्यामुळे तुमच्या सहकार्याने आणि आशीर्वादाने मी कोणाला घाबरत नाही, तुम्ही साथ द्या, मी तुमच्यासोबत कायम राहील असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी पुणे येथे बोलताना केले.



पुणे शहरातील बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित विद्यार्थी संवाद मेळाव्यात मुंडे बोलत होते. बीड जिल्ह्यातील आणि परळी मतदार संघातील विद्यार्थ्यांशी यावेळी मुंडे यांनी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले कि, या मेळाव्याला पंकजाताई मुंडे देखील येणार होत्या, पण त्या दिल्लीत आहेत, त्यांनी माझ्याजवळ शुभेच्छा संदेश दिला आहे. मी पुण्यात शिकलो असं सांगत मुंडे यांनी पुण्याचं अन माझं एक वेगळं नातं आहे असं म्हटलं.यावेळी कॉलेज जीवनातील आणि मित्रांसोबतच्या अनेक आठवणींना उजाळा देत धनंजय मुंडे यांनी मी नेता नसून तुमचा देखील मित्रच आहे, असे समजा म्हणत उपस्थित तरुणांना साद दिली.

माझ्या राजकीय प्रवासात मी अनेक संघर्ष पाहिले. रोज नव्या आव्हानांना तोंड देत मी इथपर्यंत पोहचलो आहे. राजकीय वाटचालीत मला अजितदादा पवार यांनी जी साथ दिली ती कधीही न विसरता येणारी आहे. मी दीड वर्षांपूर्वी त्यांच्यासोबत सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून काही लोक मला संपवण्याची भाषा करू लागले आहेत.

माझ्यावर खालच्या पातळीला जाऊन आरोप केले जातं आहेत, माझी जात, माझ्या कुटुंबाचे नाव अगदी माझी लायकी काढली जात आहे. एवढ्या मोठ्या माणसांनी असं बोलण योग्य नाही. पण मी कोणाला भीत नाही, घाबरत नाही. कारण तुमचा अन परळीकरांचा आशीर्वाद सोबत आहे.पुढच्या काळात बीड जिल्ह्याला विचारात घेतल्याशिवाय राज्याचं राजकारण पूर्ण होणार नाही. स्व. मुंडे साहेबांनी जिल्ह्याचे नाव देशात केलं, त्यांच्याच आशीर्वादाने मी माझ्या पद्धतीने जिल्ह्याचे नाव मोठं करण्याचा प्रयत्न करत आहे. तुम्ही सोबत रहा अन आशीर्वाद द्या असं म्हणत मुंडे यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी बालगंधर्व रंगमंदिर तरुणाईने हाऊसफुल्ल झालेले पाहायला मिळाले.व्यासपीठावर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष दीपक मानकर, समीर चांदेरे, अजय मुंडे, महादेव डोईफोडे, राजपाल लोमटे, विठ्ठल सानप, अविनाश नाईकवाडे यांसह आदी मान्यवर उपस्थित होते.

## पाटोदा व नेकनुर ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर युनिट सुरु करा

### डॉ.अशोक थोरात जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांना निवेदन:- डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

( दि.१८ ) पाटोदा तालुक्यातील पाटोदा ग्रामीण रुग्णालय आणि बीड तालुक्यातील नेकनुर स्त्री व कुटीर रूग्णालय येथे ट्रॉमा केअर सेंटरची अत्यावश्यकता असुन तातडीने सुरू करण्यात यावे. अहमदपूर ते अहमदनगर आणि पैठण ते पंढरपूर दोन राष्ट्रीय महामार्गावरील अतिवेगाने वाहन चालवणे त्याच बरोबर उखडलेले रस्ते आणि रखडलेल्या कामांमुळे वाढत्या अपघातांची संख्या पाहता तातडीने उपचार न मिळाल्याने अपघातग्रस्तांना जीव गमवावे लागत असुन तातडीने पाटोदा आणि नेकनुर याठिकाणी ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे , शेख युनुस,स्वप्निल गलधर, निळकंठ वडमारे, विजय लव्हाळे, शेख मुबीन यांनी डॉ.अशोक थोरात जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी डॉ.अशोक थोरात यांनी सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने प्रस्ताव पाठवण्याचे आश्वासन दिले.



पाटोदा तालुका हा दुष्काळी आणि ऊसतोड मजुरांचा तालुका असुन तीन तालुक्यांचे मध्यवर्ती ठिकाण आहे. अहमदपूर ते अहमदनगर आणि पैठण ते पंढरपूर असे दोन राष्ट्रीय महामार्ग तालुक्यातुन जातात.वेगाने वाहने चालविणे तसेच जागोजागी उखडलेले आणि रखडलेले रस्त्यांचे काम यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असुन तातडीने उपचार न मिळाल्याने अपघातग्रस्तांना आपले जीव गमवावे लागत आहेत.पाटोदा ग्रामीण रुग्णालयात दररोज ३०० रुग्ण उपचारासाठी दाखल होतात.याठीकाणी सुसज्ज इमारत असुन शस्त्रक्रियेसह इतर सुविधा उपलब्ध आहेत.मात्र ट्रॉमा केअर युनिटची सुविधा उपलब्ध नसल्याने अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.आष्टी व शिरूर या दोन्ही तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाच्या ठिकाणी ट्रॉमा केअर युनिटची सुविधा उपलब्ध असून केवळ पाटोदा तालुक्यातील ग्रामस्थ यापासून वंचित आहेत.हा पाटोदा तालुक्यातील ग्रामस्थांवर अन्याय आहे.त्यामुळे पाटोदा ग्रामीण रुग्णालय येथे ट्रॉमा केअर निर्मिती करून सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.अशी मागणी करण्यात आली आहे.

ट्रॉमा केअर सेंटर सुविधा उपलब्ध झाल्यानंतर त्याठिकाणी सिटीस्कॅन मशीन,एसीजी हाडाचे ऑपरेशन, २ आर्थिफिजिशियन, भुलतज्ञ,२ वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती झाल्याने तातडीने आणि दर्जेदार उपचार होण्यास मदत होणार आहे.पाटोदा ग्रामीण रुग्णालय येथे ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्यात यावे यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे आणि त्यांचे सहकारी तथा पत्रकार शेख जावेद, हमीद खान पठाण, महादेव नागरगोजे,पवन अडागळे, भगवान जावळे, राहुल जाधव, रामदास भाकरे,गौतम जावळे, रमेश दळगडे, गणेश रणदिवे यांनी दि.०५ ऑक्टोबर रोजी पाटोदा ग्रामीण रुग्णालय येथे धरणे आंदोलन केले होते.तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक डॉ.सदाशिव राऊत यांनी तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुरेश साबळे यांना धरणे आंदोलनाच्या अनुषंगाने लेखी पत्र दिले होते.

## चिंचोलीमाळी विद्युत उपकेंद्राला पाच एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर मंजुर

**केज ।प्रतिनिधी**

**रमेश इथापे केज विधानसभेच्या आमदार नमीताताई मुंदडा यांच्या प्रयत्नातून चिंचोली माळी येथील विद्युत उप केंद्रासाठी नवीन पाच एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर मंजुर झाला असुन यासाठी सर्व साधारण जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ अंतर्गत १ कोटी, ७० लाख, ५५ हजार ३५० रूपयांचा निधी मंजुर झाल्याचा व तांत्रिक मान्यता दिल्याचे आदेश जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिले आहेत. सदरचा ट्रान्सफॉर्मर आर डी एस एस योजनेतून मंजूर आहे. लवकरच टेंडर निघणार आहे. त्यापूर्वीच डी पी डी सी मधून मंजूरी दिली आहे. चिंचोलीमाळी उपकें द्रातुन शेतीपंपासाठी तीनही फीड रवरुन आळीपाळीने पाच तास विज पुरवठा केला जात होता. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी पुरेसा विजपुरवठा होत नव्हता.**



व त्यामुळे गावठाणातील विजेचे भारनियमन करावे लागत होते. त्यामुळे केज विधानसभेच्या आमदार सौ. नमीताताई मुंदडा यांच्या प्रयत्नातून सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ अंतर्गत १ कोटी ७० लाख, ५५ हजार, ३५० रूपये खर्चाच्या पाच एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर मंजुर करण्यात आला आहे. त्या संबंधीची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिली असुन हे काम लवकरच सुरू होणार आहे. या पाच एमव्हीए क्षमतेच्या ट्रान्सफॉर्मरमुळे चिंचोलीमाळी विद्युत उपकेंद्रा तुन तीनही फिडर वरुन शेतीपंपासाठी एकाच वेळी आठ तास अखंडीत विज पुरवठा होणार आहे. व गावठाणात करण्यात येणारे भारनियमन ही बंद होणार आहे. यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपासाठी अखंडीत विज पुरवठा करण्यात येणार आहे. त्यामुळे आमदार नमीताताईमुंदडा, भाजपाचे ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, व युवानेते अक्षय मुंदडा, जेष्ठ नेते सुनिल आबा गलांडे पाटील, जेष्ठ नेते रामकृष्ण घुले काका, चेअरमन अरुण तात्या काळे, उपसरपंच धिरज वनवे, व्हाईस चेअरमन आबासाहेब केदार डोका गावचे सरपंच गोरख भांगे, माजी सरपंच बापुराव भांगे, हादगावचे उपसरपंच श्रीराम वायबसे, के वडचे सरपंच बाळासाहेब सत्वधर, चेअरमन गणेश सपाटे, टाकळी चे माजी सरपंच रघुनाथ बारगजे, दगडु दळवे, दिलीप गायकवाड, रविंद्र गलांडे, राजाभाऊ नखाते, चंद्रकांत भुजबळ, मेजर हनुमंतराव वायबसे, गणेश वायबसे, भागवत वायबसे, बी. जी. गदळे, वैभव केंद्रे, अनंत कऱ्हाड, महादेव गिते, चत्रभूज वनवे, शरद कोल्हे, व्यंकट बारगजे, मुकादम गोरख बारगजे, मुकादम रघुनाथ बारगजे, जीवन बारगजे, सुरज घुले, राम घुले, प्रकाश बारगजे, विक्रम घुले, भागवत घुले, चंद्रकांत घुले यांच्यासह चिंचोलीमाळी, सारुकवाडी, डोका, हादगाव, केवड व टाकळीच्या ग्रामस्थांनी आभार मानले व अभिनंदन केले आहे.


# बीड विधान सभा मतदार संघात महाविकास आघाडी जे उमेदवार देईन एकजुटीने प्रचार करु

बीड । प्रतिनिधी

बीड महाराष्ट्रामध्ये विधान सभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे.महाराष्ट्रात तीन प्रमुख पक्ष आय काँग्रेस,राशप,व उद्धव ठाकरे सेना तिघे एकत्र येवुन महाराष्ट्रामध्ये निवडणुक लढणार आहे. सध्या महाराष्ट्रात महाविकास आघाडी खुप झपाट्यानं पुढे जात आहे.लोकसभा निवडणुकीत ही इंडीया आघाडी. ने चांगली कामगीरी केली आहे लोकसभेचे विरोधीपक्ष नेते राहूलजी गांधी यांना कामगार कष्टकरी,शेतकरी, युवकांचा व जनसामान्य जनतेचा खुप मोठा प्रतिसाद मिळत आहे. लोकसभेमध्ये इंडिया आघाडीला चांगले यश मिळाले आहे. आणि आता महाराष्ट्रात ही महाविकास आघाडीला विधान सभा निवडणुकीत मोठे यश जनतेकडून मिळणार आहे.काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना भाऊ पटोले,काँग्रेस निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभागाचे प्रदेश अध्यक्ष राधिकाताई



मखामले, खासदार सौ.रजनी ताई अशोक दादा पाटील,ओबीसी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष भानुदास माळी साहेब,बीड जिल्हा काँग्रेस कमेटीचे जिल्हाध्यक्ष राजे साहेब देशमुख,यांच्या नेतृत्वाखाली बीड विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडी जे उमेदवार देईन त्या चा एकजुटीने निवडणुकीत प्रचार करू अशी बीड जिल्हा काँग्रेस निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभाग व बीड शहर काँग्रेस ओ बी सी विभाग वतीने बीड जिल्हा काँग्रेस निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभागाचे जिल्हाध्यक्ष शेख मोहसीन बुर्हानोद्दिन, जिल्हा काँग्रेस निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष शेख आमेर पाशा ,बीड शहर ओबीसी काँग्रेस चे अध्यक्ष सय्यद फरहान सय्यद शराफत, जिल्हा ,निराधार निराश्रित व्यक्ति विकास विभागाचे बीड तालुकाध्यक्ष शेख जहीर अमीर यांनी प्रसीधी पत्रकात म्हंटले आहे.



तीर्थक्षेत्र विज्ञानेश्वर आपेगाव तालुका अंबड या ठिकाणी दैनिक आरंभ पत्रकार सुमेध करडे यांनी भेट दिली असता त्यांचा सत्कार करताना ट्रस्टचे अध्यक्ष मुरली अण्णा चौधरी तसेच पदाधिकारी व सोबत रवी अण्णा रायते.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) परळी युवक तालुका –अध्यक्षपदी रतन रोडे यांची निवड

परळी । प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री. मा .ना. रामदासजी आठवले. साहेब यांच्या विचाराला प्रेरित होऊन महाराष्ट्र युवक प्रदेश अध्यक्ष . तथा बीड जिल्हा अध्यक्ष. माननीय पप्पू जी कागदे साहेब. यांच्या नेतृत्वाखाली परळी तालुका युवक अध्यक्षपदी .रतन रोडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे परळी नगर परिषदचे गटनेते तथा. युवकांचे युवक नेते .सचिन भाऊ कागदे यांच्या हस्ते नवनिर्मित परळी तालुका युवक अध्यक्षपदी. रतन रोडे यांना निवडीचे प्रमाणपत्र देण्यात आले यावेळी रिपाई परळी तालुका अध्यक्ष. शरण मस्के परळी शहर अध्यक्ष. कार्तिक कांबळे नवनिर्मित तालुका उपाध्यक्ष. राजू भूतके प्रकाश गायकवाड ओम नागरगोजे सुधीर रोडे सुबोध गायकवाड चाऊस भाई साहेब राहुल रोडे सिद्धार्थ रोड दत्ता घनगाव प्रशांत रोडे दीपक रोडे रामदास रोडे कृष्णा वाघमारे. आधी रिपाई चे नेते पदाधिकारी व भीमसैनिक कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी .परळी नगरपरिषद गट नेते . सचिन भाऊ कागदे .यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया बीड जिल्ह्यामध्ये ताकद वाढली पाहिजे खऱ्या अर्थाने सामाजिक केंद्रीय न्याय मंत्री .रामदासजी आठवले .साहेब यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यामध्ये मोठी ताकद उभी करण्याचे असे आश्वासन देण्यात आले.



# ॲड. डॉ.स्वाती मोराळे यांची ग्राहक संरक्षण समितीच्या महाराष्ट्र राज्य कायदेशीर सल्लागार पदी निवड

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : ड.डॉ.स्वाती मोराळे या उच्चशिक्षित असुन नुकतेच त्यांनी एल. एल. बी. पदवी संपादित केली आहे. त्या गेली दहा वर्षे सामाजिक, पत्रकार, उद्योग क्षेत्रात कार्यरत आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचे मोठे नेटवर्क आहे.त्यांनी एम. एस. डब्लू., एल. एल. बी., बी. जे., बी. ए., बी. एड., डी. एड., डी. एस. एम., एम. बी. ए., डी. टी. एल., आणि डी. एल. एल. एल. डब्ल्यू. अशा अनेक क्षेत्रात शिक्षण घेतले आहे. त्यांच्या शिक्षण,अनुभव व संघटनाचा फायदा




समितीला होईल यासाठी ग्राहक संरक्षण समितीचे अध्यक्ष दादासाहेब केदारे व सचिव डॉ. अविनाश झोटिंग यांनी ड.डॉ.स्वाती मोराळे यांची समितीच्या महाराष्ट्र राज्य कायदेशीर सल्लागार पदी निवड केली आहे. आज मोठ्या प्रमाणात ग्राहकांची फसवणूक होत आहे. त्याला आळा घालणे, फसवणूक झालेल्या ग्राहकांना कायदेशीर मदत करणे त्यांच्या हक्काचे संरक्षण करणे यासाठी मी प्रयत्न करणार आहे असे त्यांनी सांगितले. ही माझ्यासाठी मोठी संधी आहे आणि याचा फायदा मला व महाराष्ट्रातील लोकांना नक्कीच होईल.

# आज भाजपाची पहिली यादी प्रसिद्ध होणार

## केजमधून आ. नमिताताई मुंदडा यांचा पहिल्याच यादीत समावेश

केज ।प्रतिनिधी

राज्यातील महायुतीची पत्रकार परिषद पार पडल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला असून आता उमेदवारी यादी प्रसिद्ध होणार आहे. वंचित बहुजन आघाडीने या आधीही यादी प्रसिद्ध केलेली आहे आणि आजही प्रसिद्ध केली आहे. राज्यातील महाविकास आघाडी आणि महायुतीच्या जागा वाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात आली असून त्याची घोषणा होणार आहे. महायुतीच्या सर्व जागांचा घोळ मिटला असून काही जागांवर तडजोडी होणे बाकी आहे. तेही सोपस्कार येत्या एक दोन दिवसात पूर्ण होतील. परंतु ज्यांना भाजपा उमेदवारी देणारच आहे किंवा जे उमेदवार फायनल आहेत आणि जो मतदारसंघ भाजपच्या ताब्यात आहे. त्या ठिकाणच्या उमेदवार्या जाहिर केल्या जाणार आहेत. भाजपने पहिल्या यादीचा मुहुर्त उद्या शुक्रवारचा काढला असून ११० भाजप उमेदवारांची यादी सायंकाळी प्रसिद्ध केली जाणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.या पहिल्या यादीत केज विधानसभा मतदार संघाचा समावेश असून याठिकाणी विद्यमान आमदार नमिता अक्षय मुंदडा यांची उमेदवारी जाहिर होणार आहे. कारण ही जागा मूळ भाजपच्या ताब्यात आहे. शिवाय आमदार नमिता मुंदडा यासुद्धा फिक्स उमेदवार आहेत. त्यामुळे त्यांच्या नावाला 'ग्रिन सिग्नल' दाखवून प्रचार करण्यासाठी आवश्यक तो कालावधी देण्याचा प्रयत्न भाजपाकडून केला जाणार आहे.महायुतीची पत्रकार परिषद काल बुधवार दि.१६ ऑक्टोबर २०२४ रोजी पार पडली. या पत्रकार परिषदेत महायुतीचे प्रमुख मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे प्रमुख नेते उपस्थित होते. या तीन्ही नेत्यांनी मोठ्या आत्मविश्वासाने सामोरे जाणार असल्याचे जाहिर केले. शिवाय यावेळी 'फेक नरेटिव्ह' ला मतदार बळी पडणार नाहीत असे ठणकावून सांगितले. महायुतीची सत्ता आल्यास सर्व योजना सुरु राहतील. त्यामुळे मतदारांनी पुन्हा महायुतीला आपला कौल दिला जाणार असल्याचे तीनही मान्यवरांनी सांगितले. राज्यातील भाजपाचे जे उमेदवार फायनल आहेत किंवा ज्या जागा भाजपा लढणार आहे आणि ज्या जागेचे उमेदवार अंतिम आहेत त्यांना प्रचाराला भरपूर अवधी मिळावा यासाठी भाजपाची पहिली ११० उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. लोकसभा निवडणुकीत उमेदवारांची यादी उशीरा जाहिर करणे भाजपाला महागात पडले आहे. त्यामुळे यावेळी ती चुक पुन्हा केली जाणार नाही याची दक्षता घेत उमेदवारी यादी उद्या शुक्रवार दि. १८ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी उमेदवारी यादी जाहिर केली जाणार आहे. भाजपाच्या वतीने प्रसिद्ध होणार्या पहिल्याच यादीत केज विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे. कारण या ठिकाणच्या आ. नमिता मुंदडा यांच्या कामाचा सकारात्मक अहवाल पक्षश्रेष्ठीकडे गेला आहे. सर्वेक्षणात सुद्धा ही जागा उजवी दाखवली आहे. विकासात्मक कामामध्ये बीड जिल्ह्यात केज मतदारसंघ अव्वल ठरला आहे त्यामुळे त्याचा विचार करुन एक तरुण व उच्च विद्याभुषित, अभ्यासू आमदाराला पुन्हा उमेदवारी दिली जाणार आहे. माजी मंत्री पंकजा मुंडे यांचासुद्धा आ. नमिता मुंदडा यांच्या नावाला हिरवा कंदील असल्याने उद्याच्या पहिल्या यादीत आ. नमिता मुंदडा यांचे नाव असणार आहे. खर्या अर्थाने



उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर प्रचाराला सुरुवात होईल परंतु उमेदवारी जाहिर झाल्यानंतर त्या कामाला गती येत असते त्या प्रमाणे आ. नमिता मुंदडा यांना पहिल्या यादीत स्थान देण्यात आले असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

## येतील किती जातील किती येऊ द्या किती

# बीडजनात पृथ्वीराज साठे साहेबच होणार आमदार ते पण वजनात-मेघराज भैय्या गालफाडे

केज ।प्रतिनिधी

विधानसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात डझनभर उमेदवारांनी प्रवेश केला आहे. प्रवेश केल्या केल्या त्यांना आमदारकीचे तिकीट हवे आहे. तिकीट मिळवण्यासाठी पक्षाशी एकनिष्ठ राहावे लागते. निवडणुकीच्या तोंडावर केज मतदारसंघातील वातावरण सध्या शरदचंद्र पवार पक्षाच्या बाजूने झुकलेले आहे .त्यामुळे केज मधून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाची उमेदवारी मिळवण्यासाठी अनेक नवखे चेहरे असले तरी उमेदवारी आपल्यालाच मिळणार आपण निवडून येणार असा अति आत्मविश्वास बाळगून असलेल्या अंजली घाडगे यांचा देखील यात समावेश आहे. मागच्या वेळी भाजपची उमेदवारी मागणाऱ्या डॉ.अंजली घाडगे यांना भाजपने उमेदवारी नाकारतात भाजपला सोडचिठ्ठी देऊन काँग्रेसचे अशोक चव्हाण रजनी ताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली ऐनवेळी आय काँग्रेसमध्ये प्रवेश केला व मागची विधानसभेचे निवडणूक काँग्रेसच्या तिकिटावर लढवली मात्र दुर्दैवाने यात डॉ. अंजली घाडगे या पराभूत झाल्या पराभूत होताच अंजली घाडगे यांनी लगेच काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटात प्रवेश केला तेथेही काही काळ लोटतो तोच पुन्हा शिवसेना उद्धव ठाकरे गटाला सोडचिट्टी देऊन शिवसेना शिंदे गटात सामील झाल्या. आता शिंदे यांच्या शिवसेनेला सोडचिठ्ठी देत निवडणुकीच्या तोंडावरच शरदचंद्र पवार यांच्या उपस्थित मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला पाच वर्षात पाच वेळा पक्ष बदलणाऱ्या डॉ.अंजली घाडगे यांना जनतेने एकदा नाकारले आहे पुन्हा शरदचंद्र पवार पक्षाकडे एका स्थानिक बड्या पुढाऱ्याचा वशिला लावून तिकीट मलाच मिळणार आहे असे जोरदार चर्च सुरू आहे. जरी उमेदवारी मिळाली तरीही मतदार संघातील जनता डॉ. अंजली ताई घाडगे यांना स्वीकारणार नाही कारण केज मतदार संघातील जनतेच्या मनात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे साहेबच आहेत कारण काँग्रेसमध्ये शरदचंद्र पवार आणि अजितदादा पवार यांच्यात फूट पडल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्ह्यात बीडचे विद्यमान आमदार संदीप भैया शिरसागर व केजचे माजी आमदार पृथ्वीराज साठे साहेब हे दोनच शिलेदार शरदचंद्र पवार साहेबांच्या सोबत खंबीरपणे व निष्ठेने उभे राहिले होते. पक्ष आणि नेतृत्व अडचणीत असताना पडत्या काळात अडचणीच्या वेळी पक्ष सोबत व शरद पवार साहेबांचा सोबत राहून या दोन शिलेदारांनी बीड जिल्ह्यातून खंबीरपणे साथ दिली आहे हे पक्ष नेतृत्वाला विसरून चालणार नाही. नेतृत्व आणि पक्ष संकटात सापडल्या नंतर सत्तेची कास न धरता शरदचंद्र पवार साहेबांना खंबीरपणे साथ देणारे केज विधानसभेचे माजी आमदार पृथ्वीराज साठे साहेब विसरून चालणार नाही कारण पक्षाला कायम साथ देणारे अडीअडचणीच्या काळात देखील पवार साहेबांसोबत खंबीरपणे उभे राहणारे व निष्ठावंत म्हणून ओळखले जाणारे माजी आमदार पृथ्वीराज साठे यांना अडीच वर्षाचा आमदारकीचा काळ भेटला असताना साठे साहेबांनी मतदारसंघात अनेक विकास कामे करून जनसामान्य माणसात आपला आगळावेगळा ठसा उमटवला आहे त्यामुळे साठे साहेब हे केज मतदार संघातील सामान्य जनतेच्या गळ्यातील ताईत बनले आहेत निष्ठावंत साठे यांनाच केज विधानसभेची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारी मिळायला हवी अशी भावना जन सामान्यत व प्रत्येकाच्या मनामनात आहे या



भावनेचा आदर करून पक्षाने पृथ्वीराज साठे साहेब यांनाच उमेदवारी द्यावी अशी मागणी देखील मतदारसंघातून जोर धरत आहे. कारण प्रत्येक गावा गावात साठे साहेब हे गेले आहेत पाच वर्षापासून मतदार संघात सामान्य जनतेच्या प्रश्नासाठी झगडत आहेत साठे यांच्याशी मतदारसंघातील जनतेचे नाड जोडली गेली आहे . वेगवेगळ्या आंदोलनात आणि पक्षीय कार्यात सतत सक्रिय सहभागी असणाऱ्या व सर्वसामान्य नागरिकांच्या सुख दुःखात कायम सहभागी असणारे माजी आमदार पृथ्वीराज साठे हेच तेच मतदारसंघातील जनतेच्या मनातील राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाचे उमेदवार आहेत. अशीच केज मतदार संघातील जनसामान्यात भावना बनलेली आहे. त्यामुळे माजी आमदार पृथ्वीराज साठे साहेब यांनाच उमेदवारी देऊन केज मतदार संघातील जनसामान्यांच्या भावनांची कदर करावी लागेल. अन्यथा पक्षाला मोठी किंमत मोजावी लागेल.

# डॉ.योगेश क्षीरसागर यांचा ग्रामीण भागामध्ये दौरा सुरू

## ह.भ.प. नवनाथ बाबांचे आशिर्वाद घेऊन दौऱ्याची सुरुवात

बीड (प्रतिनिधी)

बीड विधानसभा मतदारसंघात गावागावातून मिळणारा पाठिंबा हा ऊर्जा देणारा आहे, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली आहे. बीड तालुक्यातील बकरवाडी, मन्यारवाडी, आंबेसावळीसह अनेक गावांमध्ये डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शुक्रवारी (दि.१८) सकाळी भेटी देत ग्रामस्थांशी संवाद साधला. शांतिब्रह्म ह.भ.प. नवनाथ बाबांचे आशिर्वाद घेऊन डॉ.क्षीरसागर यांनी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने दौऱ्याची सुरुवात केली.



डॉ. क्षीरसागर यांचा ग्रामीण भागात दौरा सुरू झाला असून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या दौऱ्यात जि.प.चे माजी सदस्य तथा सरपंच ड.राजेंद्र राऊत, पं.स.चे माजी उपसभापती अरुण लांडे, सरपंच बाबासाहेब पवार, भिकाराम शिंदे, शिवाजी मुंडे, जानकीराम काळे, सखाराम काळे, एकनाथ पवार, रितेश लांडे, सतिश काळे, सिताराम गाडे, पोपट काळे, प्रकाश पोपळे, ज्ञानोबा शिंदे, परमेश्वर शिंदे, सिद्धेश्वर पोपळे, उत्तम शिंदे, माजी सरपंच प्रदीप गुंदेकर, कुंडलिक बांडे, पवन गुंदेकर, सौरभ गुंदेकर, ज्ञानेश्वर बांडे, जयराम गुंदेकर, व्यंकटेश गुंदेकर, हनुमंत बांडे, मच्छिंद्र बांडे, विश्वंभर नवसागर, विष्णू गुंदेकर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

ह.भ.प.नवनाथ बाबांनी दिले आशिर्वाद बीड तालुक्यातील बकरवाडी येथे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दौऱ्यानिमित्त पोहोचले. यावेळी शांतिब्रह्म ह.भ.प.नवनाथ बाबा यांची भेट घेतली. बाबांचे आशिर्वाद घेऊन त्यांनी दौऱ्याची सुरुवात केली. यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते.

# नामनिर्देशनावेळी पाच व्यक्ती, तीन वाहनांपर्यंत परवानगी

बीड ।प्रतिनिधी

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी वाहनांच्या ताफ्यात तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या, वाहनांचा समावेश नसावा. उमेदवाराने नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात, दालनात पाच व्यक्ती व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. तसेच कार्यालयात नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध करण्यात येत असल्याचे जिल्हादंडाधिकारी यांनी निर्गमित केलेल्या आदेशात म्हटले आहे.

## टी.सी. हरवला आहे

रंगनाथ सत्यप्रेम थेटे रा.राजेवाडी ता. माजलगाव जि.बीड येथील रहिवासी असून त्यांनी बीएससी उत्तीर्ण झालेला टी.सी. महाविद्यालयातून घेतला परंतु माजलगांव ते तेलगांव बस प्रवासादरम्यान टी.सी. हरवला आहे. जरी कोणाला सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधून देण्यात यावा ही विनंती. संपर्क.८३०८१६७५१९

# गेवराई येथील र.भ. अट्टल महाविद्यालयाचे नाव संस्कृती येवले व हरी भुसेंनी केले गौरान्वित!

## संस्कृती येवले व हरी भुसे यांची राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिनी परेड संचालनासाठी निवड



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : येथील र.भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाची विद्यार्थिनी संस्कृती येवले हिची व हरी भुसे या दोन विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिनी परेड संचालनासाठी निवड झाली आहे. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने परेड संचालनाचे आयोजित केले होते. कठोर परिश्रम आणि प्रखर इच्छाशक्तीच्या जोरावर संस्कृती येवले ला व हरी भुसे यांना हे यश मिळाले आहे. बीड जिल्ह्यातून या दोनच विद्यार्थ्यांची निवड झाली असून, या निवडीने सर्वत्र स्तरावर कौतुक होत आहे. नांदेड येथे प्रजासत्ताक दिनाच्या परेड संचालनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ स्तरावर हे शिबिर आयोजित केले होते. या प्रजासत्ताक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय निवड पूर्व चाचणी शिबिरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघात संस्कृती येवले व हरी भुसे यानी सहभाग नोंदवला होता. तसेच दि.१९ सप्टेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथील राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन राज्यस्तरीय निवड शिबिरासाठी पूर्व निवड चाचणी आयोजित करण्यात आलेली होती. या पूर्व चाचणी मार्फत गेवराई येथील र.भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाची विद्यार्थिनी संस्कृती येवले व हरी भुसे याची राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिनी परेड संचालनासाठी निवड झाली आहे. २६ जानेवारी रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचालन शिबिरासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे परेड संचालनात निवड करण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात दि.२३ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२४ दरम्यान या राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन राज्यस्तरीय निवड चाचणी शिबिरासाठी विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले होते. र.भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाची विद्यार्थिनी संस्कृती येवले व हरी भुसे याची राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिनी परेड संचालनासाठी निवड झाल्याने सर्वत्र स्तरावरून अभिनंदन केले जात आहे. या खडतर आणि कठीण स्पेर्धेमध्ये संस्कृती येवलेंनी व हरी भुसे यानी उल्लेखनीय यश मिळवले. त्याच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे विद्यापीठाचे व र.भ. अट्टल कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे नाव गौरान्वित झाले आहे. त्याच्या या यशासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य शिखरे मॅडम आणि सहकार्यानी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## ३०७ च्या आरोपीला भेटण्यासाठी पोलिसांनीच

# घातला धिंगाणा, बीड शहर ठाण्यात गुन्हा दाखल, धिंगाणा घालणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यावर निलंबनाची कारवाई

**बीड ।प्रतिनिधी**

**येथील शहर पोलीस ठाण्यात ३०७ प्रकरणातील आरोपीला भेटण्यासाठी थेट चार पोलिसांनीच मद्यप्राशन करून धिंगाणा घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पोलिस कर्मचारीच दारू पिऊन आरोपीला भेटण्यासाठी धूडगुस घालत असल्यामुळे खळबळ उडाली आहे. विपुल गायकवाड असे आरोपीचे नाव आहे.**

त्याच्यावर ३०७, ३२७/२३ भादवि नुसार गुन्हा दाखल आहे. विपुल मागच्या अनेक दिवसांपासून फरार होता. त्याला अटक केल्यानंतर पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. त्यामुळे तो शहर पोलीस ठाण्यातील जेलमध्ये होता. यावेळी विपुलला भेटण्यासाठी रात्रीच्या सुमारास १० ते १२ जण दारूच्या नशेत आले होते. यावेळी पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असलेले ठाणे अंमलदार रेडेकर यांनी या सर्वांना भेटीपासून रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र दारूच्या नशेत असलेल्या लोकांनी रेडेकर यांना शिवीगाळ करून सरकारी कामात अडथळा आणला. विशेष म्हणजे कायद्याची पायमल्ली करण्यात चार पोलीस कर्मचाऱ्यांचा वाटा होता. यात मुख्यालयातील विनायक जोगदंड, आरसीपीमधील श्री. खेडकर, गेवराईचे पोलीस कर्मचारी



गणेश कुटे आणि शहर पोलीस ठाण्यातील कर्मचारी संदीप कांबळे यांनी धिंगाणा घातल्यामुळे त्यांच्यावर ही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार त्या चार कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

# मोंढा रोडवर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजने नावाचा बोर्ड लावण्यास

## बीड नगर परिषदचे मुख्यधिकारी व बांधकांम अभियंता यांना का विसर पडला-प्रा. सनी वाघमारे

बीड ।प्रतिनिधी

प्रभाग क्रः- २ (डउ राजीव) मोंडा रोड गेल्या अनेक वर्षापासून सदरील रस्ताची अवस्था अत्यंत वाईट परस्थिती झाली आहे. मोंटा रोड हा कृषी उत्पन्न बाजार समिती , एम.आव.डि.सी, खंडेश्वरी मंदिर देवस्थान अनेक ठिकाणी हा रस्ता जोडला आहे. बीड जिल्हा प्रशासनाने लोकाच्या हिताच्या प्रश्न सोडवून या संकटातून मुक्त केले आहे. वाचाचत मी बीड जिल्हा प्रशासनाची मनः पुर्वक आभार व्यक्त करतो. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार सन २०२४-२५ योजनेतून प्रभाग क्रः- २ (डउ राखीच) मोठा रोड शिव-शारदा विल्डिंग ते जिजामाता चौक ते संत सावतामाळी चौक ते अमरधाम स्मशानभूमी पर्यंत रस्त्याच्या कामासाठी ४ कोटी २० लाख रुपये निधी देण्यात आला. सदरील काम हे समर्थ कन्ट्रक्शनचे ठेकेदार पाठक नामक व्यक्तीला देण्यात आला. परंतु लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित बस्ती सुधार योजना नावाचा बोर्ड



लावण्यास श्रीछ नगर परिषदचे मुख्याधिकारी व बांधकांम अभियंता यांना का विसर पडला. का जाणीवपुर्वक नावाचा बोर्ड टाळण्यात आला १ वाठिकाणी मा. मुखवधिकारी साहेब, बांधकाम अभियंता साहेब, पाठक नामक ठेकेदार साहेब यांचा जो काही हेतु असेल तो मी याठिकानी साध्य होऊ देणार नाही. मा. मुख्याधिकारी साहेब, बांधकांम अभियंता साहेब याप्रकाराला खतपाणी घालत तर नाहीत ना ? मी वा प्रसिध्दातून माध्यमातून संबंधित अधिकारी व ठेकेदारास चिनंती करतो की, आपण दोन दिवसात तीन ठिकाणी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित चस्ती सुधार योजने नावाचा बोर्ड लावण्यात वावा. अन्यथा मी बीड नगर परिषद कार्यालव वेथे आंदोलन करणार आहे.

# दत्तात्रेय विसवळे हे माजलगाव विधानसभा लढणारच

**माजलगाव /प्रतिनिधी**

**माजलगाव तालुक्यातील धडाडीचे, सर्वसामान्यांचे नेते म्हणून ओळख असलेले मा.दत्ता विसवळे माजलगाव मतदार संघात सध्या विधानसभेसाठी तयारी करत असून येत्या काळात ते आमदार दिसतील असे सर्वसामान्य नागरिकांतून बोलले जात आहे**

व प्रस्थापिटतासाठी पितासाठी नव्हे तर लोकशाहीत सर्वांना मुभाअसते राजकीय मक्तेदारी मोडीत काढावी लागेल त्यामुळे मी माजलगाव विधानसभा लढणारच असे मत व्यक्त नेते दत्तात्रेय विसवळे यांनी केले आहे. प्रसंगी घुसखोरावर मात करून गरुड भरारी घ्यावी लागते. माजलगाव मतदार संघाचा पल्ला गाठण्यासाठी दत्ता विसवळे यांची पुरेपूर तयारी झाली आहे. व सर्वसामान्य जनतेची नाळ जोडली आहे. मतदार खुल्या मनाने बोलत नसला तरी निवडणुकीच्या रंणधूमाळीत भय मुक्तीसाठी दत्ता विसावळे यांना माजलगाव मतदार संघातील मतदार राजा बिनधास्त मतदान करेल.



# शिंगणे, पाटील यांनी धरली शरद पवारांची साथ

## दादांच्या राष्ट्रवादीला रामराम करण्याच्या तयारीत

प्रतिनिधी । मुंबई

महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक प्रक्रिया पुढच्या महिनाभरात पार पडेल. पण त्याआधीच शरद पवारांनी पुन्हा एकदा अजित पवारांना मोठा धक्का दिला आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या दोन नेत्यांनी शरद पवारांची भेट घेतली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेंद्र शिंगणे यांनी शरद पवारांची भेट घेतली. त्यांचा शरद पवार गटातील प्रवेश निश्चित झाला आहे. तर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रवक्ते उमेश पाटील हे देखील नुकतंच शरद



पवारांना भेटले आहेत.

बुलढाण्यातील सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेंद्र शिंगणे हे अजित पवारांची साथ सोडणार आहेत, अशी माहिती मिळते आहे. राजेंद्र शिंगणे लवकरच शरद पवार गटात प्रवेश करणार असल्याची माहिती आहे. काही



दिवसांआधी सुप्रिया सुळे यांच्या गाडीतून एका नेत्याने प्रवास केला होता. यावेळी फाईलने त्यांनी चेहरा झाकला होता. अजित पवार गटाचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील हे शरद पवार यांच्या भेटीसाठी दाखल झाले आहेत. उमेश पाटील हे लवकरच शरद पवार गटात प्रवेश करणार असल्याचं बोललं जात आहे. उमेश पाटील शरद पवारांच्या घरी जात असताना त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. मी राजकारणात आल्यापासून मोहोळमधील हुकुमशाहीला विरोध आहे. शरद पवारांसोबत असल्यापासून माझा या हुकुम शाही आणि दडपशाहीला विरोध आहे. त्याच मुद्यावर शरद

पवारांसोबत बोलण्यासाठी मी इथं आलो आहे, असं उमेश पाटील म्हणाले. शरद पवार गटात प्रवेश करणार का? या प्रश्नावर थेट उत्तर देणं उमेश पाटील यांनी टाळलं. आधी मी शरद पवारांची चर्चा करतो, असं ते म्हणाले.

# विद्यार्थ्यांच्या गणवेशाविषयी अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटना (जि.प.) बीडचे शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन

## उर्दू माध्यमाच्या १३ शिक्षकांना दर्जावाढ; १९ प्रा.पदवीधर न.नि.शि. सेवकांना नियुक्ती आदेशाबद्दल आभार

प्रतिनिधी । बीड

विद्यार्थ्यांच्या गणवेशाविषयी मागणी करणारे निवेदन देऊन, उर्दू माध्यमाच्या १३ शिक्षकांना दर्जावाढ आणि नवनियुक्त शिक्षण सेवकांना नियुक्ती आदेश दिल्याबद्दल प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी यांचे अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटना (जि.प) बीड ने आभार व्यक्त केले.

याविषयी संघटनेने दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, शासनाने सुरु केलेल्या मोफत गणवेश योजना २४-२५ मध्ये विद्यार्थ्यांना गणवेश किंवा गणवेशासाठी कापड देण्यात येत




आहे. बीड जिल्ह्यातील उर्दू माध्यम व मराठी माध्यमातील अल्पसंख्यांक समुदायातील मुस्लीम मुलींसाठी कमीज-सलवार व दुपट्टा तसेच मुलांसाठी हाफ पॅन्ट व हाफ शर्ट ऐवजी फुल पॅन्ट व फूल शर्ट द्यावा किंवा त्यासाठी लागणारे कापड उपलब्ध करुन देण्यात यावे. अशी मागणी अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटना (जि.प.) बीड ने दिलेल्या निवेदनातून केली आहे. तसेच उर्दु माध्यमाच्या १३ शिक्षकांना दर्जावाढ दिल्याबद्दल आणि पवित्र पोर्टल द्वारा उर्दू माध्यमाच्या १९ प्राथमिक पदवीधर नवनियुक्त शिक्षण सेवकांना नियुक्ती आदेश देण्यात आले. म्हणून प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी यांचा संघटनाच्या वतीने सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी बीडचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी पठाण समुंदर खान, मुहम्मद ईसाक, संघटनेचे जिल्हाध्यक्ष काझी मुशाहेद, कार्याध्यक्ष उस्मान खान, मोमीन जावेद,शेख इम्रान आदी उपस्थित होते.

# भाजपचे पहिले दहा मतदारसंघ ठरले

## चंद्रकांत पाटील कोथरुडमधून रिंगणात, दोन मंत्र्यांच्या नावावर शिक्कामोर्तब : सूत्र

प्रतिनिधी । मुंबई

राज्यातील विधानसभा निवडणुकांची घोषणा करण्यात आल्यानंतर राजकीय पक्षांकडून हालचालींना वेग आला आहे. राज्यात महायुती व महाविकास आघाडीने बैठकांचा धडाका लावला असून आजच महायुतीच्या तिन्ही प्रमुख नेत्यांनी पत्रकार परिषद घेऊन आपलं रिपोर्ट कार्ड जनते समोर सादर केलंय. त्यानंतर, आजच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे राजधानी दिल्लीत जाणार असून तेथे महायुतीमधील जागावाटपावर चर्चा होणार आहे. या बैठकीत महायुतीमधील १२० नावांवर अंतिम निर्णय होणार आहे. तत्पूर्वी भाजपकडून २५ उमेदवारांची यादी निश्चित करण्यात आली असून १० मतदारसंघातील नावांवर शिक्कामोर्तबही झालं आहे. त्यानुसार, सध्याच्या सरकारमधील ६ विद्यमान मंत्र्यांना पहिल्या यादीतून गाळण्यात आलंय. मात्र, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री चंद्रकात पाटील यांचे नाव निश्चित झाल्याचे समजते. भाजपकडून २५ उमेदवारांची यादी तयारी असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री चंद्रकांत पाटील यांचे मतदारसंघ निश्चित झाल्याची सुत्रांची माहिती आहे. त्यामध्ये, चंद्रकांत पाटील यांना पुन्हा एकदा कोथरुड



मतदारसंघातून उमेदवारी निश्चित झाल्याचे समजते. मात्र, भाजपच्या या पहिल्या यादीतून ६ विद्यमान मंत्र्यांना वगळण्यात आल्याची माहिती आहे. त्यातच, उमेदवारांच्या नावाची घोषणा पुढील २ दिवसांत होण्याची शक्यता आहे. कारण, विधानसभा निवडणुकांची घोषणा झाल्यानंतर उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुक उमेदवारांकडे केवळ १५ दिवसांचाच कालावधी उरला आहे. त्यामुळे, उमेदवारीची घोषणा झाल्यानंतर मतदारसंघात प्रचारफेरी आणि सभांची व मतदारांपुढे जाऊन मतदानाचे आवाहन करण्यासाठीची तयारी उमेदवारांना अल्पावधीतच करावी लागणार आहे.

राज्यात महायुती व महाविकास आघाडी यांच्यात काँटे की टक्कर होणार असून वंचित बहुजन आघाडी व राज ठाकरेंच्या नेतृत्वातील मनसेनंही उमेदवारांची घोषणा करण्यास सुरुवात केली आहे. महायुतीकडून काही मतदारसंघात उमेदवारांनी नावे पुढे आली आहेत. तसेच, महाविकास आघाडीकडूनही काही मतदारसंघात उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आलीय. मात्र, अधिकृतपणे उमेदवारांची घोषणा करण्यात मनसे व वंचित बहुजन आघाडीनेच आघाडी घेतल्याचं दिसून येतं. मनसेनं आत्तापर्यंत ७ मतदारसंघात उमेदवार घोषित केले आहेत. तर, वंचित बहुजन आघाडीने २१ मतदारसंघात उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. त्यातच, आता भाजपकडून १० मतदारसंघातील उमेदवारांची नावे निश्चित झाल्याची माहिती आहे.

नंदूरबार - विजयकुमार गावित नागपूर पश्चिम देवेंद्र फडणवीस - कोथरुड - चंद्रकांत पाटील धुळे ग्रामीण - सुभाष भामरे धुळे शहर अनुप अग्रवाल रावेर हरीभाऊ जावळे भुसावळ - संजय सावकारे जळगाव - सुरेश भोळे शहादा- राजेश पाडवी सिंदखेडा- जयकुमार रावल

# महायुतीला मोठा धक्का! जानकर महायुतीतून बाहेर

## महायुतीतील जागावाटपावरून जानकर नाराज असल्याची चर्चा

प्रतिनिधी । मुंबई

विधानसभेच्या निवडणुकीची घोषणा होताच महायुतीला मोठा धक्का बसला आहे. राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांनी महायुतीतून बाहेर पडण्याची घोषणा केली आहे. महादेव जानकर यांचा पक्ष आता राज्यात स्वबळावर निवडणूक लढवणार आहे. महायुतीतील जागावाटपावरून जानकर नाराज असल्याची चर्चा होती.

गेल्या काही दिवसांपासून महादेव जानकर हे महायुतीमध्ये नाराज असल्याची माहिती आहे. महायुतीकडे विधानसभेसाठी त्यांनी ४० ते ५० जागांची मागणी केली होती. पण त्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळेच त्यांनी आता महायुतीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. महादेव जानकर यांचा राष्ट्रीय समाज पक्ष आता राज्यात सर्व जागा स्वबळावर लढणार आहेत. महादेव जानकरांनी लोकसभा निवडणूक ही महायुतीच्या माध्यमातून लढवली होती. मात्र परभणीतून त्यांचा पराभव झाला होता. त्यानंतर विधानसभेला आपल्या पक्षाला सन्मानजनक जागा मिळाव्यात यासाठी जानकर प्रयत्नशील होते. पण त्यांना अपेक्षित जागा मिळणार नाही असं लक्षात येताच त्यांनी महायुतीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे.

महायुतीला रामराम केल्यानंतर आता महादेव जानकर यांचा पक्ष राज्यात किती जागा लढवणार हे पाहावं लागेल. परंतु महादेव जानकरांच्या या निर्णयामुळे महायुतीला मात्र मोठा धक्का बसल्याचं सांगितलं जातंय. आता भाजप आणि

महायुतीकडून जानकरांची नाराजी दूर केली जाणार का हे पाहावं लागेल. महायुतीतून बाहेर



पडल्यानंतर महादेव जानकर यांनी प्रतिक्रिया दिली. आपल्याशी महायुती किंवा महाविकास आघाडीने संपर्क साधला नसून आपण आपल्या पक्षाच्या वाढीसाठी हा निर्णय घेतला आहे असं ते म्हणाले. २८८ जागा लढवण्यासाठी आपण तयारी करत असल्याचं जानकर म्हणाले.